# एकटी

ती अमेरिकेत येते नवऱ्याबरोबर. दोन वर्षात परत जाण्याच्या इरादयाने. प्रत्यक्षात परत जाणं लांबत जातं. दोन वर्षानी भारतात जावून यायचा बेत होतो. पहिल्या भारतात जाण्याच्या वेळेला ती खूप अपेक्षा मनात ठेवून जाते पण तिथे गेल्यावर लक्षात येतं की ह्या दोन वर्षात पुलाखालून बरचं पाणी वाहून गेलय. 'प्रत्येकजण आपापल्या विश्वात मग्नं आहे. नातेवाईक, मित्रमैत्रीणी सगळ्यांना एकमेकाचं दैनदिंन आयुष्यं, समस्या माहित आहेत. 'तिला सगळ्यांनी कितीही सामावून घ्यायचा प्रयत्न केला तरी तिला ती काठावर असल्यावर सारखं वाटत रहातं. ती एकदम अलिप्त होते, दुखावते.भारतात कायम परत जायचं म्हणून तिने स्वःताला अमेरिकेतही तसं अलिप्तच ठेवलेलं असतं. आता लक्षात येतं की तशी तर ती कुठेच सामावून नाही जावू शकत. पण ती निर्णय घेते अमेरिकेत राहून आनंदी रहाण्याचा. एकदा ठरवलं म्हटल्यावर ती सगळं जमवतेही. बरीच वर्षे जातात. त्या तिघांचं सुखी कुटुंब आता छान रमलेलं असतं अमेरिकेत. तिचा चिमुकलाही एव्हांना पंख फुटून भरारी मारायला लागतो. इतकी वर्षे त्याच्यासाठी म्हणून केलेल्या गोष्टी करणं आता गरजेचं राहिलेलं नसतं. पुन्हा एकदा तिचं मन उचल खातं, परत जाण्याची इच्छा बळावते. ती बापलेकांसमोर हा विषय पुन्हा काढायचाच असं ठरवते. उत्साहाने फ्रेश होते. गार पाण्याचे हबके तोंडावर मारता मारता तिच्या लक्षात येतं पुढे काय होणार ते.चिंटया ओ मॉम करत तिथून निघून जाणार तर चिंटयाचे बाबा शाळेत शिकलेली तीच गोष्ट परत सांगणार.

"एकदा एका कावळ्याला मोराचं पीस सापडलं...!"

आपण कोण? कावळा की मोर? टी स्वतःलाच जोरजोरात विचारत रहाते. बेसिनवर धडाधड बुक्के मारत ती कमोडच्या हिरव्यागार कव्हरवर बसकण मारते. हळूहळू पाय पोटाशी घेवून गुडघ्यात डोकं खूपसून ती तशीछा बसून रहाते. एकटी...अगदी एकटी!